म. ग्रं. सं. ठाणें
विषय
ग्रं. क्र.

REFBK-0006196

REFBK-0006196

# जलधारा

१०८०१

बाबुलनाथ ... मराठी ...
दा. क्र. ६१.८८

REFBK-0006196
REFBK-0006196

आर्यसंस्कृति प्रकाशन

किंमत बारा आणे

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रक व प्रकाशक— लक्ष्मण नारायण चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८/१७ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें शहर.

माझे वडील बंधु
कै० शंकर शामराव काळे
उर्फ कवि 'चंद्रचूड'
यांच्या पवित्र चरणीं
सादर समर्पण


—बाबुलनाथ

'शामसदन'
६०-६१-६२ सोमवार पेठ
पुणें शहर
रामनवमी, शक १८६३

# वर्षाव


| कविता | पृष्ठ |
|---|---|
| हिंदुंनो उठा अतां यापुढें ! | १ |
| रोहिणी | ३ |
| अभिलाष सारखा तव धरितों— | ५ |
| भारतमातेस— . | ७ |
| पहिली केस अर्थात् Maternity starts at Home ! | ९ |
| बागेंत फिरणाऱ्या पांखरास— | ११ |
| दीन माय एकलीच— | १२ |
| प्रेम तूं देशील कां ! . | १४ |
| बघावयास आलों, पण— | १५ |
| सुंदर श्रावण मास ! . | १७ |
| माझी नोकरी . . | २० |
| कैदेंत तुझ्या मी— . | २२ |
| उमलती कळी. . | २४ |
| तव प्रिया राजसा— . | २६ |
| नागिणी . . | २८ |
| अर्गळची राणी . | ३० |
| खेड्यांत संध्याकाळीं— . | ३८ |
| सासुरवास अर्थात् सूनबाईचें गाणें . | ४० |
| पुण्याचे मामटे आम्ही ! | ४१ |
| बसली रंगमहालीं— . | ४४ |
| पंजरस्थ पक्ष्याचें स्वातंत्र्यगीत | ४६ |
| सोनेरी टोळी . . | ४८ |
| मयूरा ! . . | ४९ |
| जाहीर सभा . . | ५० |
| तुझें प्रेम . . | ५२ |
| ऑफिसांस निघतांना— | ५४ |
| ऑफिसांतून आल्यावर— | ५५ |
| होशिल मम सांग कधीं—! | ५६ |
| मावशीची आठवण . | ५८ |
| कुंजवनांत— . . | ६० |
| मर्दै मराठ्यांस— . | ६४ |
| आजचें रणकंदन . | ६६ |
| भेट ती होणार केव्हां—! | ६८ |
| मास्तर आणि मुलें . | ६९ |

| कविता | पृष्ठ | कविता | पृष्ठ |
|---|---|---|---|
| बुरखेवाला . . | ७० | मानीन तुला मी अपुली– | ८० |
| पाहूं किती वाट– ! . | ७१ | पिंजऱ्यांतील मैना . | ८१ |
| तुझें हें रूप पाहूनी– . | ७२ | वांझ . . | ८२ |
| लोपलें सौंदर्य कोठेंसें जरा– | ७४ | कुठवर–! . . | ८४ |
| पाऊस पुरवला ! . | ७६ | कवींनो ! . . | ८६ |
| दुर्दशा ही भारताची– . | ७७ | कांहीं म्हणा पण– . | ८७ |
| घे सुरी– . . | ७८ | राष्ट्रीय निशाण . | ८८ |
| चोर, साहित्यसेवक आणि | | कशाचें स्वातंत्र्याचें गीत– ! | ९० |
| मिशा ! . . | ७९ | होउं शिपाई ! . | ९२ |



*Thus let me live unseen, unknown;*
*Thus unlamented let me die;*
*Steal from the world, and not a stone*
*Tell where I lie.*

A. POPE

७०८०९
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६१८५

# हिंदुंनो उठा अतां यापुढें !

[केशवकरणी]

उठा हिंदुंनो ! उठा हिंदुंनो ! उठा अतां यापुढें
सांगतो कळवळुनी आंतडें !

हा ऱ्हास जाहला स्वतंत्रतेचा किती
नच अजुनी तुम्हां कैशी त्याची क्षिती
परकीय तुम्हांला हवेतसें गांजिती
मूक मेंढरांपरी जाहलां ! दास्य कसें आवडे ?
हिंदुंनो उठा अतां यापुढें !

त्या शूर पूर्वजां मनामधें आठवा
देहांत तयांचें शौर्य तसें सांठवा
नच बसुनी लाभे स्वातंत्र्याची हवा
वेळप्रसंगीं रक्त सांडण्या घ्या पैजेचे विडे
हिंदुंनो उठा अतां यापुढें !

दास्यांत लोळुनी किड्यापरी चाकर
कां खातां तुम्ही मेलेली भाकर ?
ही झोंप सोडुनी जागे व्हा लौकर
आळस कांहीं नको शिका ते स्वातंत्र्याचे धडे
हिंदुंनो उठा अतां यापुढें !

परक्यांस लुटाया धन तुमचें फावलें
दुष्काळ पडूनी तुम्ही पुरे नाडले
नुकसान कळेना रोज कसें चाललें
हीन दशेची चीड न येतां जगतां कां बापुडे
हिंदुंनो उठा अतां यापुढें !

तीं पितरें स्वर्गामधें अश्रु ढाळती
हीं पोरें तुमचीं येथें आक्रंदती
कलिकाळ कोपुनी येइं जणूं भारतीं
परकी सत्ता देउनि लत्ता करी तुम्हां नागडें
हिंदुंनो उठा अतां यापुढें !

परधर्मामध्यें जाती तुमचे जन
हें तुम्हांस आहे खरोखरी लांच्छन
यापुढें आपुलें करुनी संघट्टन
संभाजीसम धर्म पाळुनी चारा म्लेंच्छां खडे
हिंदुंनो उठा अतां यापुढें !

तीं अनेक राष्ट्रें स्वतंत्र झालीं जरी
हा देश अजूनी परक्यांच्या पंजरीं
धिक् जिणें कसें हें जगतां तुम्ही तरी ?
देशासाठीं बना शिपाई ! झडवा रण-चौघडे
हिंदुंनो उठा अतां यापुढें !

निःशस्त्र कसे हो तुम्ही बरें जाहलां ?
तें हत्यारबंधन दूर करा आजला
नव शस्त्रास्त्रांची शिका सर्व ती कला
स्वातंत्र्यास्तव लढुनि झुगारा दास्याचें जोखडें
हिंदुंनो उठा अतां यापुढें !

# रोहिणी

[ मंजरी ]

येऊन उन्हाळा सुटी मला लागली
नोकरी करुनि शहरांत वृत्ति गांजली
खेडयांत रंगलों आनंदें जाउनी
मैत्रीण भेटली बालपणाची जुनी !

'रोहिणी' तिचें तें नांव किती सुंदर
वय नव्हतें आतां तेरा-चवदावर !
रेखीव जाहली शरिराची बांधणी
हिरकणी शोभली यौवनिंच्या कोंदणीं !

तो रंग तनूचा गुलाबकलिकेपरी
बघतांच गमे कां स्वर्गांतिल ही परी !
ही दिसावयाला साधी असुनी जरी
भासते खरोखर मजला गुणसुंदरी !

मन निर्मळ भासे पवित्र गंगाजल
मुखहास्य दर्शवी भाग्य तिचें उज्वल !
सहवास सुखवितो मला तिचा नेहमीं
धनकुंभ लाभतां काय गरीबां कमी ?

बहु श्रीमंती ना तिच्या घरां लाभली
वडिलार्जित होती जमीन थोडी भली !
झोंपडी सान नी शेतकरी राहणी
निज मातापितरां मदत करी रोहिणी !

सुप्रभातकालीं आरवतां कोंबडा
रोहिणी उठूनी घेउनि डोंई घडा
पाण्यास नदीवर जाउनिया झरझर
ती भरते पाणी गात गीत सुस्वर !

न्याहरी करूनी वडिलांच्या संगत
शेतांस गुरांना नेइं चारण्या नित !
शेरडें, श्वान तिज पळावया लाविती
त्या चपला 'हरिणी'पुढें न त्यांची गती !

कधिं 'प्रधान-राजा' मोटेला जुंपुनी
ती गान गातसे वनदेवी शोभुनी !
अन् माच्यावरती चढुनी सायंतनीं
गोफणें फिरवितें पक्ष्यांना हेरुनी !

ही कार्यकुशलता अशी तिची पाहुनी
आनंद वाटतो मला मनांपासुनी !
शहरांत लाभल्या किती जरी मैत्रिणी
हृदयांतुनि जाइल काय कधीं रोहिणी ?

# अभिलाष सारखा तव धरतों —

[ प्रणयप्रभा ]

अभिलाष सारखा तव धरतों
हें वेड काय मी पांघरतों ?

प्रथमदर्शनीं लागुनि चटका
प्रीतिरसाचा प्यालों घुटका
स्वभाव माझा कांहिं न लटका
मम जीव तुझ्यास्तव हुरहुरतो !

सौंदर्याची तूं गुण-खाणी
भूवर आलिस जणुं इन्द्राणी
तुजवर भुलुनी बघ हा प्राणी
दिनरात अंतरीं तुज स्मरतों !

कुलशीलाची तूंच कामिनी
चंचल जरि गमशी सौदामिनि
करावयाला तुला स्वामिनी
उद्देश मनांतुनि सुरसुरतो !

सुख तुज देतां आलें मरण
सोशिन तेंही ठेवी स्मरण
उकलुं कसें पण अंतःकरण ?
मज सांग तसें मी आचरतों !

मज चंद्रा तूं सुभग चांदणी
ठेवियलें तुज हृदय-कोंदणीं
घ्याया पण तव प्रेम आंदणीं
ये संकट तरि तें संहरतों !

सत्प्रेमाच्या स्फूर्ती-लहरी
उसळी घेती मम हृत्कुहरीं
त्यांत न तूं विष टाकी जहरी
तव रुकार मिळण्या आतुरतों !

## भारतमातेस—

[तलवार लांकडी ही]

चल, ऊठ ऊठ आई ! धांव घेई
ही काळझोंप तव परदास्यांतिल सरत काय नाहीं ?

देशांत दुहींचें बंड
परक्यांचें त्यांतुनि बंध
जखडती अम्हां अत्यंत
हें जहर विषारी जिव्हाग्रीं गे करी लाहि लाही !

कां स्वतंत्र लोपुनि काळ
ठाकला नवा वेताळ
घेउनी रूप विक्राळ
नामर्द बनवि कां हिंद-जनांचें तेज सर्व कांहीं !

भाग्यश्री तव ती थोर
लुटण्यास्तव येती चोर
चोर ते आणि शिरजोर
ते तैमुर-नादिर म्लेंच्छ लुटारू पुन्हां ठायिं ठायीं !

माजतांच मोंगलशक्ती
शिवबानें करुनी सक्ती
स्थापिलें राज्य-नव युक्ती !
उंदीर गिरींतिल संधि साधतां भूप थोर होई !

मावळे मराठे दर्दी
अर्बूज जात ती खंदी
शिवबांस लागतां हातीं
राष्ट्रकार्य तें एकजुटीनें यशोद्यान दावी !

भाऊंची शौर्य भरारी
नानांची कर्तबगारी
बापूंची दिव्य थरारी
ती प्रतापशाली उदेल केव्हां पुन्हां पेशवाई ?

माउली 'जिजा' गुणखाणी
श्रीमती अहिल्या बाणीं
झांशीची तैशी राणी
त्या शूर स्त्रियांना जन्म भारतीं पुन्हां आज देई !

जरिपटका, भगवा झेंडा
हटवून जयांनीं गुंडां
चकित सर्व केलें खंडां
ती फडफड त्यांची वायुरवें कधिं यशोगान गाई ?

चल ऊठ, देवने ! ऊठ
तुज असें कशाची तूट ?
'स्वातंत्र्य' लूट बेछूट !
स्वातंत्र्य घ्यावया परदास्याच्या तोड शृंखलाही !

# पहिली केस

## अर्थात्

## Maternity Starts at Home !

[ दिंडी ]

चार वर्षांचा 'कोर्स' असूनीया
दहा वर्षें लागलीं पास व्हाया !
शहर वस्तीचें प्रमुख जिथें ठाणें
'दवाखाना' थाटला 'डॉक्टरा'नें !

दवाखान्याला जोडुनी तसेंच
स्थान देई तो प्रसूतीगृहास !
परीचारक ठेविला नोकरीला
नर्स तैशी मिळण्यास योग आला !

कैक महिन्यांचा काल सरुनि गेला
कुणि न रोगी ढुंकला औषधाला
'प्रसूती'ला लाभली स्त्रीं न कांहीं
मात्र दैना उडवून खर्च देई !

सर्व पैसा जवळचा सरुनि जाई
लग्न त्याचें जाहलें त्यांत नाहीं !
बहर आतां संपेल यौवनाचा
ध्यास म्हणुनी अंतरीं विवाहाचा !

नर्स सुंदर जी त्यास लाभलेली
(बहिण होती जरि प्रथम मानलेली)
हाय ! केलें तिजवरी प्रेम त्यानें
नाहिं झाला पण बद्ध विवाहानें !

प्रेमचाळे जरि असे चालवीले
बिंग त्याचें शेवटीं फुटुनि गेलें !
दिवस जातां लोटून (तिला) कांहीं
'केस' पहिली प्रसुतीस घरीं येई !

# बागेंत फिरणाऱ्या पांखरास —

[माळीण]

गुणगुण कां करुनी
सारखी गुणगुण कां करुनी
फिरशि कशास्तव सांग पांखरा! ह्या रम्योद्यानीं!
वसंत येऊनी
रम्य हा वसंत येऊनी
सृष्टि सर्व ही सजली शालू शाद्वल लेऊनी!
त्या आम्रतरूंना मोहर ये बहरुनी
वाढती तयांवर लता कशा बिलगुनी?
अन् फुलें उमलती ताऱ्यांपरि चमकुनी
सुवर्णवेळ कुणी
अशी ही सुवर्णवेळ कुणी —
दिली पांखरा! तुला विहरण्या येथें दिनरजनी?
गाउनिया गाणीं
गोडशी गाउनिया गाणीं
स्वैर भराऱ्या मारितोस कां इकडुन तिकडूनी?
उमलल्या कळ्यांवर आनंदें नाचुनी
कां घेशि चुंबनें मन त्यांचें रिझवुनी?
वद, पिशी कशास्तव मधु त्यांना फसवुनी?
धन्य तुझी करणी
पांखरा! धन्य तुझी करणी
वसंत जातां गाशिल ऐसें कां रे गुणगुणुनी?

# दीन माय एकलीच —

[ अवनी ]

दीन माय एकलीच सोडुनी कुमारा
लोपलास शोभुनि कां दिव्य शुक्र-तारा ?

जन्म जसा घेतलास
हीरक तूं झळकलास
अरुण जणूं दूर करित येइं अंधकारा !

उद्धरण्या हीन कुलां
अवतरला तूं छकुला
जपलें तुज कीं अगदीं लागुं नये वारा !

मजुरी मीं करुनि किती
खपलें त्यां नाहिं मिती
दिधला पण खावयास तुज मौक्तिक-चारा !

काळ हाच काय दुष्ट
सुस्थितीस करुनि नष्ट
गरिबांना डागण्यास दावि तो निखारा !

तूं असतां, नाथ-निधन—
झालें, तरि तुजसि बघुन
आवरलें दुःख; तुला द्यावया निवारा !

मातेची कींव तुला
आली पण नाहिं मुला
त्यजुनि तूंहि जाशि तिचा मोहमय पसारा !

झालेलें दुःख असें
साहूं मी सांग कसें ?
फुटुनि हृदय येति नयनिं कढत अश्रुधारा !

मृत्यू मज ये नच कां ?
जगतीं मम जन्म फुका
हाय ! जीवनांत अतां रुक्ष तो सहारा ! !

# प्रेम तूं देशील कां ?

[गझल]

प्रेम तूं देशील कां गे मी करूं कां याचना ?
वंचना तूं ना करावी ही जिवाची वासना !

पाहुनी सौंदर्य तूझें चित्त माझें रंगलें
सांगु कैशी अंतरीं जी गूढ हो संवेदना ?

थोर तूं साक्षात लक्ष्मी ना कमी कांहीं तुला
रत्न तूं लाभावयाला काय दैवी योजना ?

पात्र तूझ्या प्रीतिसाठीं दीन मी होईन कां ?
काय सांगावी कुणाच्या ये मनीं जी कल्पना ?

ह्या जिवा त्वद्दर्शनाची ओढ लागे सारखी
आणि खोलूं मी कशा गे अंतरींच्या भावना ?

मूर्त तूझी अंतरीं मीं पूर्ण आहे कोरली
तुष्ट तूं होण्यास देवी नित्य चाले प्रार्थना !

वस्तु सृष्टीतील साऱ्या काय देती सांगुनी
एकटें राहून कांहीं माधुरी ना जीवना !

'ह्या जगीं ज्यां प्रेम लाभे धन्य त्याचें हो जिणें'
गोड हा संदेश आला कां न तूझ्याही मना ?

प्रेम सर्वस्वीं जिवाचें मीं तुला ना अर्पिलें ?
तें नको वेडे ! झुगारूं मान्यता दे मीलना !

## बघावयास आलों, पण—

[मंजरी]

तुज 'बघावयाला' आलों जेव्हां घरीं
शृंगार किती तूं नटुनी केला तरी !
'स्नो' तशी 'सफेती' मुखास तूं लाविली
अन् चकणी दृष्टी चष्म्यानें झांकली !

घर भाडोत्री तव देइ स्थिती सांगुनी
नच प्राप्ती येथें अन्य, मुलीवाचुनी !
तव 'गरिबी' असुनी अंगावर ह्या क्षणीं
घातले दागिने कोणाचे मागुनी ?

भोंगळी इर्कली साडी जी नेसली
कां आजीच्या ती होती लग्नातली ?
आखूड जहाले केस अकालीं गळून्
शेपूट जोडलें गंगावन कां म्हणून् ?

वाचून घेतलें कुठें 'मराठी' जरा
तव जिभलीची मज दिसली न्यारी तऱ्हा
ती 'सदर्न्-मराठा' रखडे मार्गी जशी
अडखळे तोतरी वाचा तव गे 'म्हशी'* !

'तुज काय काय तें सांग येतसें बरें ?'
हा प्रश्न टाकतां भरलें तुज कांपरें !
जिव झाला तूझा क्षणांत घामाघुम
'मज येतें सारें—' वदतां लागे दम !

अन् चहा शेवटीं आंतुनि तूं आणिला
लंगडा पाय तों चुकून दिसला मला !
साखरेविना. तव चहा बळें ढोसुनी
निःश्वास सोडिला ! निघतांना तेथुनी !

* ह्या दोनअक्षरी शब्दाशिवाय तिच्या शरीरसौष्ठवाचें वर्णन आणखी तें काय करायचें ?

# सुंदर श्रावणमास !

[ कोकिळा ]

सुंदर श्रावणमास !

जिकडे तिकडे खालींवरती
मांगल्याला येउनि भरती
आनंदाला सीमा नच ती
सृष्टिसुंदरी नटुनी थटुनी करिते आज विलास !

पर्जन्याची झिंबड पहिली
वर्षुनि आतां रानें सगळीं
हिरवीं हिरवीं दिसूं लागलीं
मोत्यांसम तीं कणसें करिती वायूसह नृत्यास !

वेली नूतन पान-फुलानें
बहरुनि मोठ्या आनंदानें
सुवास अपुला सत्प्रेमानें
वातावरणीं उधळुनि देती संतत दाहि दिशांस !

प्राजक्ताला बहार आला
सुवर्णचंपक फुलुनी गेला
गोजिरवाणा गुलाब खुलला
दिव्य केतकी पसरी अपुला मोहक गोड सुवास !

पिवळें तांबुस कवळें ऊन
जिकडे तिकडे स्वच्छ पडून
सुंदर पक्षी त्यांत उडून
वनदेवीला गाणें गाती लुटुनी आनंदास !

स्वच्छंदी तीं फूलपांखरें
फुलां-फुलांवर घालुनि फेरे
गुणगुण करिती पिउनी वारें
गुंजारवही भृंग करूनी लुटती गोड मधास !

हिरवळलेल्या कुरणावरती
गाइवासरें यथेच्छ चरती
रमवायातें त्यांची वृत्ती
सुखी गुराखी घेउनि पांवा काढिति मंजु सुरांस !

प्रभातसमयीं लौकर उठुनी
परडया हातामधें घेउनी
बाला वनदेवी त्या गमुनी
दूर्वा-पत्री-फुलें आणिती देव-पूजना खास !

सणवारांची गर्दी उडते
शाळेलाही सुट्टी मिळते
घरांत खाया गोड लाभतें
चंगळ होउनि सर्व मुलांना वाटतसे उल्हास !

मुली मंगळागौर पूजिती
जागुनि रात्रीं मजा मारिती
मौज तयांची वर्णाया ती
स्फूर्ति कवीची गोठुनि अंतीं होइल पार खलास!

शुद्ध व्हावया शरीर अपुलें
करिति 'श्रावणी' भाविक भोळे
मात्र शहाणे सुधारलेले
त्यांचा करती 'श्रीपादां'च्या* लेखासम उपहास!

सुवासिनींचे शुक्रवासरीं
'हळदीकुंकू' घरीं नि दारीं
पुरुष, मुलें पण ह्याच विचारीं—
हातुनि त्यांच्या कांहिं 'फुटाणे' उरतिल कां आम्हांस?

मुलां-मुलींना, स्त्री-पुरुषांना
वर्षांतिल हा एकच महिना
सुखांत जातो सर्व जणांना
नैराश्याचें मीच कशाला गाऊं गान उदास?

* कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

# माझी नोकरी

'माझी सिंधु' गेल्याचें दुःख जितकें कवि सरोज-सुहृद यांना झालें नाहीं त्यापेक्षां किती तरी भयंकर दुःख 'माझी नोकरी' सुटल्यामुळें ह्या महापुरुषास (!) झालें आहे. दुःखांतसुद्धां चढाओढ लागण्याचा प्रसंग यावा ना ? अरेरे !

लागली न तों ती—
नोकरी सुटूनियां गेली !

असतांना 'मी कामावरती
कांहिं न होतें मजला कमती
अंबारी पण झाली उलटी
अरेरे ! दैवगती फिरली !

कोणी किंवा तिजवर टपुनी
दिला वशीला भला लावुनी
पगार त्यांतहि कमी करूनी
अरेरे ! ओढुनि ती नेली !

लांच न दे मी कसली कांहीं
'वरिष्ठ' म्हणुनां चिडुनी जाई
मला वृथा तो काढुनि देई
अरेरे ! नीति जगीं नुरली !

छान नोकरी ती टिकणारी
जाउनि दैवीं ये बेकारी
कठिण खरोखर वेळ दुपारीं
अरेरे ! भूक न कां मेली ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६१८८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

व्यूह जिवाचा जीवर रचिला
कशी न रुचली तुज ती काळा ?
नागात्रिशी मज घालुनि घाला
अरेरे ! मति माझी भ्रमली !

प्रश्न असा हा बेकारीचा
सुटेल केव्हां न कळे कैसा ?
भोग परंतू आतां माझा
अरेरे ! काय दशा आली !

'देवा ! नोकरि तूं ना द्यावी
दिली तरी ती कधिं न सुटावी'
जीव तोडुनी तुज मी विनवीं
अरेरे ! मृत्यु अतां वाली !

## कैदेंत तुझ्या मी—

[प्रणयप्रभा]

कैदेंत तुझ्या मी तडफडतें
बाहेर सुटाया धडपडतें !

युद्धावरती जातां प्रियकर
जोहाराचा प्रसंग सुखकर
घडवित असतां, धांवुनि लवकर—
पकडिलें तुवां म्हणुनी कुढतें !

आर्य-स्त्री मी रजपूताची
चाड असे मज निज रक्ताची
गाशी महती जरी स्वतःची
नच भूल तुझ्याविषयीं पडते !

मुसलमान तूं जागिरदार
धनदौलतही तव भरदार
मजवर होशी जरी उदार
मोहांत न कसल्या सांपडतें !

जबरीनें छळ किती करविला
दुष्ट बेत या मनीं ठरविला
पाप न शिवतें कधिं साध्वीला
पति-प्रेम जिचें ना गडगडतें !

क्रूर भयंकर तूं दुष्मान
पदोपदीं करशीं अपमान
व्हाया निजधर्मा बेमान
मी मरेन, पण तें ना घडतें !

नीतिभ्रष्ट तूं जों होशील
तों प्रभु रक्षिल माझें शील
शाप सतीचा पण भंवशील
जाईल तुला मग अवघड तें !!

# उमलती कळी

[गोकुळिंचा कान्हा]

उमलती कळी ही कोणीं टाकिली ग कुस्करून ?
दुर्दशा तिची ही बघुनी हृदय जाइं थरथरून !

काल ह्याच बागेमध्यें
फिरतां मी सखये येथें
दिसे कळी जाईची ही छान वेल मोहरून !

दिवस् एक थोडा असुनी
हवा, ऊन, पाणी मिळुनी
वेलीवर केशी गेली उमलण्यास तरवरून !

एकुलती अगदीं एक
वेलीची शोभुनि लेक
स्वच्छंदें वायूसह ती घेइं स्वैर संचरून !

पाऊस भले वळवाचे
वादळ वा सोसाट्याचे
पातले, तरी ना डरतां, धीर राहिली धरून !

दरवळून अपुला गंध
भ्रमरांना करुनी धुंद
हृदयांतिल प्रेम तयांचें पार घेतलें हरून !

'उमलेल कळी ही जेव्हां
घेईन तिला मी तेव्हां'
काल मन्मनानें ऐसा बेत ठेविला करून !

हाय ! आज येतां कसलें
दृश्य बाइ भलतें दिसलें
पाकळ्या कळीच्या भूला कोणिं टाकिल्या चुरून !

हृदयाला धक्का बसुनी
मन्मानस गेलें थिजुनी
हाय ! कंठ दाटुनि तैसे येति नयनही भरून !

नच घेउनि वास स्वतांला
वाहिली न वा देवाला
सार्थक ना केलें कोणीं हिचें गूण ते स्मरून !

हें दुष्टपणाचें कृत्य
स्त्रीहृदयाचें ना खचित
पुरुषजात निर्दय बाई ! जाइ प्रेम अंतरून !

किति कळ्या अशा ह्या जगतीं
जुलमानें सुकती, मरती
उद्धरावया त्यां देवा ! येशि कां न अवतरून ?

## तव प्रिया राजसा—

[प्रणयप्रभा]

तव प्रिया राजसा नवतरणी
दिनरात लागली बघ झुरणी !

जादुभुलावण करुनी राया
लाविलीस तूं मजला माया
त्वत्प्रेमें मम झुलुनी काया
  अर्पिलें सर्व मीं तव चरणीं !

प्रेमाचा तव जडुनी छंद
सौख्यसागरीं बनतां धुंद
प्रतारणा करशिल हा गंध—
  लागला न मज अंतःकरणीं !

हाय ! शेवटीं बांधुनि चंग
वचनाचा तूं करुनी भंग
त्यजिला माझा सात्त्विक संग
  कां प्रेम तुझें रे वरकरणी ?

अशनीं-शयनीं सर्व ठिकाणीं
मूर्त दिसे तव गोजिरवाणी
त्यजिसी राजा कां ही राणी ?
ओढितें सारखी तव स्मरणी !

फसवा तव हा स्वभाव-धर्म
ओढवि माझें दुब्ळें कर्म
खऱ्या प्रीतिचें ठसुनी मर्म
सुधरेल अजुनि कां तव सरणी ?

न जाणसी मम कसा स्वभाव ?
तुझ्याविशीं मज प्रेमळ भाव
ये तर तूं मम नाहिं निभाव
किति करूं तुझी मी मनधरणी ?

# नागिणी

[शूर्पणखा]

गेला तुझ्यावर बसून । सख्या जीव गेला तुझ्यावर बसून !

मी अमेरिकेहुनि आलें
हिंदुधर्मामधें मिसळलें
हरीजन-कार्य हातीं धरून ! सख्या०

हरीजनांचि सेवा मला
करीतांना येई अडथळा
ढोंगी तुझे कांहीं शिष्य भेटून ! सख्या०

माझ्या रूपास ते भाळले
कार्य पवित्र थंडावलें
पापी कृत्यामधें आह्मी रंगून ! सख्या०

मज पस्ताव झाला अती
प्रायश्चित्ताविना ना गती
दाव दया, मला शुद्ध करून ! सख्या०

* * *

मति गांधींची गुंगुनि गेली
नील नागीण गाय जाहली
बिंग तिचें सारं बाहेर फुटून ! सख्या०

परीवर्तन तिचं पाहुनी
साबरमतीस गांधीजिनी
पाठविली छान 'सोवळी' करून ! सख्या०

कवि गिरीशांच्या 'शूर्पणखे'ला ही 'नागिणी' सवत होऊं तर पहात नाहीं ना ?

# अर्गळची राणी

[उद्धव]

गाजली जगीं जाहीर अर्गळची राणी शूर !

दिल्लीच्या तख्तावरती मुसलमान होता राजा
राहणी तयाची साधी कारभार ना चैनीचा
खंडणीवसूलीसाठीं सर्वांवर ताबा त्याचा
अर्गळचा गौतम राणा
रजपुती तयाचा बाणा
खंडणी न देई कोणा
अर्धांगी त्याची प्यार अर्गळची राणी शूर !

खंडणी न येण्याविषयीं दिल्लीला वार्ता कळली
सम्राट चिडूनी गेला युद्धास तयारी केली
काशिच्या सुभेदाराला धाडिलें तयें त्यावेळीं
रजपूत सामनेवाला
युद्धांतहि नाहीं डरला
शत्रूला जर्जर केला
मदतीला त्यांत हुषार अर्गळची राणी शूर !

यवनाशीं लढतां होई परिणामीं जय अपुणाला
लागला न डाग म्हणूनी आनंदित गौतम झाला
बोलवून अपुल्या लोकां उत्सव तो त्यानें केला

रजपूतवीर-वरांचा
उत्सव तो विजयश्रीचा
आनंदित-अभिमानाचा

जाहली तयांत पुढार अर्गळची राणी शूर !

आनंद असा जरि चाले दु:ख तेंच येई पुढती
संपतां दिवस सौख्याचा काळोखी रजनी जगतीं
पुष्पराज तोच गुलाब कांट्यांसह त्याची वसती

हा सुखदु:खांचा झगडा
चालवितो अपुला पगडा
मनुज-जीव करितो वेडा

अपवाद कुठुनि ठरणार ? अर्गळची राणी शूर !

दासींसह बसली असतां राणी ती बागेमध्यें
सांजकाळ होती तेव्हां नजर तिची गेली कोठें
अशुभ चिन्ह आकाशांत क्षितिजावर दिसलें मोठें

अवसेला चंद्रकलेची
बारीक कोर कुंकाची
भासलीच सुवासिनींची

बघुनी मनिं झाली चूर अर्गळची राणी शूर !

त्या दुसऱ्या दिवसाआधीं    मध्यान्हकाळपर्यंत
गंगेचें स्नान न केलें    परिणाम तरी ना गोड
तें अनिष्ट वाटे तिजला    संपन्न अशा राज्यांत

गंगेचा सारा प्रांत
निजशत्रूच्या ताब्यांत
तरि काळाच्या जबड्यांत

जावयास होइ तयार    अगळची राणी शूर !

राणीचा दासीसंगें    गुप्त बेत ठरुनी जाई
मध्यरात्र पडली तेव्हां    जाण्याची उडली घाई
दासींसह गेली राणी    कळवितां न कोणा कांहीं

अंधार भयंकर कोण ?
काळोखी रात्र भयाण
पायानें तुडवित रान

गंगेस निघाली पार    अगळची राणी शूर !

जरि नभीं न तेव्हां तारा    तरि त्यांसम होत्या दासी
चंद्राची सुंदर कोर    राणी ती शोभे खाशी !
गंगेला भेटायाला    अप्सराच आल्या हौशी

रात्र ती सरूनी गेली
मंगला प्रभात उदेली
गंगाही तेव्हां दिसली

स्नानास होइं आतूर    अगळची राणी शूर !

भागीरथि पुण्यसलीला किति दिव्य तिचें तें रूप
प्रेम-पुण्य-पावित्र्याचा संचय जो जींत अमूप
माहात्म्य तिचें गातांना साधुसंत थकले खूप

शोभा ती घाटावरची
त्या पहांटच्या समयाची
वर्णावी कुठवर कैशी ?

बघुनी हो थक्क अपार अर्गळची राणी शूर !

पसरला लांब तो होता बक्सारचा दगडी घाट
पोळ्यांत जशा मधमाशा जनसमूह तेथें दाट
स्नानाचा संध्येचाही उसळला भयंकर थाट

भटजींची धांदल चाले
जप करीत ढोंगी बसले
दक्षणेस लोभी टपले

कुळ गांठाया भरपूर अर्गळची राणी शूर !

घाटावर तळ देऊनी स्नानाला राणी गेली
पापांचें क्षालन करण्या गंगेंत बुडी मारियली
तें अनिष्ट टाळायाला विधिपूर्वक पूजा केली

ती आली म्हणुनी तेथें
कळतांच सुभेदारातें
एकाकीं त्याच क्षणातें

धरण्यास करी निर्धार अर्गळची राणी शूर !

उगविण्यास मागिल सूड  संधी ही आहे छान
राणीला कैद कराया  स्वजनांस दिलें फर्मान
आसक्त तिच्यावर झाला  तो पशू खरा नादान
ती येइल त्या मार्गाला
रोखुनिया तोही बसला
बेहोष मनांतुनि झाला
आवडली त्याला फार  अर्गळची राणी शूर !

देवधर्म सर्व करून  दासींच्यासंगें राणी
कृतकृत्य मनांतुनि झाली  पार सर्व पडली करणी
गंगेचा घेइ निरोप  दु:खानें तिजला वदुनी—
'हे पवित्र गंगामाते !
ह्या तुझ्याच प्रांतामध्यें
स्थल देशिल कां आम्हातें ?
करुं नकोस अगदीं दूर  अर्गळची राणी शूर' !

वाटेनें जातां जातां  कल्पना न कसली शिवली
टोळधाड तों शत्रूची  राणीवर तुटुनी पडली
तो सुभेदारही आला  गर्जना तयाची झाली—
"राणीला पकडा ! पकडा
दासीही नच त्या सोडा
वचपा तो मागिल काढा !"
ती स्थिती जरी घनघोर  अर्गळची राणी शूर !

भयभीतीनें कंपीत राणी नच झाली अगदीं
तें रजपूताचें रक्त जातिवंत त्यांत धडाडी
वीराची पत्नी तेव्हां वचनबाण ऐसे सोडी—

"धिक्कार तुम्हां लोकांना
अबलांशिं युद्ध करतां ना ?
हा काय शिपाई बाणा ?

हार ना कधीं जाणार अगळची राणी शूर !

बेशरम तुम्ही नामर्द युद्धांत पळालां तेव्हां
मुर्दाड शिपाई तुम्ही पति माझा लढला जेव्हां
पत्नी मी त्याची बिजली नच भिणार कोणा केव्हां

मी मरावयाला सिद्ध
परि येथें जो रजपूत
जो असेल त्याला खुद्द

वदतें मी—'घे तलवार' अगळची राणी शूर" !

ते पतिव्रतेचे शब्द पातिव्रत्य रक्षायाला
ती आर्यस्त्रीची हांक मातेला वांचविण्याला
संदेश तोच बंधूला भगिनीला सोडविण्याला

ऐकेल न सांगा कोण ?
धांवलेच रजपुत दोन
'हर हर' हे शब्द वदून—

गर्दींतुनि त्याच चिकार अगळची राणी शूर !

अभयचंद, निर्भयचंद नांवें तीं त्यांचीं होतीं
दोघांचे थोडे लोक कुमक तीच तेव्हां मोठी
सेनेला सेना भिडली युद्धाला आली भरती
त्या निर्वाणीच्या वेळीं
कणसासम कत्तल झाली
रुधिरानें भूमी न्हाली
रणचंडि घेइ अवतार अर्गळची राणी शूर !

भिरभिरा उडति तलवारी चालले घपाघप भाले
गर्जना करुनि घनघोर एकमेक तुटुनी पडले
जखमांना नाहीं गणती मुर्द्यांवर मुर्दे पडले !
घालमेल हो सैन्यांची
दरद ना कुणा मरणाची
घुमराई वीरश्रीची
चालतां लढे अनिवार अर्गळची राणी शूर !

शत्रूच्या सैन्यामधला फौजेचा तुटला बंद
होउनिया दाणादाण प्रत्येक जहाला धुंद
लागुनिया वार मर्मेच मेला तो निर्भयचंद
कर्णासम योद्धा गेला
परि दुसरा नाहीं डरला
ताडताड उडुनी लढला
चेतवी तयाचा जोर अर्गळची राणी शूर !

वार्ता ही इतुक्यामध्यें गौतमास जाउनि कळली
वायूच्या वेगें त्यानें येउनिया स्वारी केली
शत्रूची कंबर खचुनी पळवाट तयांनीं धरली

विजयाचा झेंडा धरुनी
सुखरूप बघूनी राणी
आनंद भूप तो मानी

मनिं काढुनि धन्योद्गार— 'अर्गळची राणी शूर'!

उलगडा सर्व गोष्टींचा राजाला कळुनी चुकला
मृत पाहुनि निर्भयचंद तो मनांत कष्टी झाला
मोलाचा मोठा मान लाभला अभयचंदाला !

तो कमी जरी जातीनें
निज कन्या अभिमानानें
त्यांप्रती दिली राजानें

ऋण ऐसें फेडी थोर अर्गळची राणी शूर !

दुष्ट त्या सुभेदाराची जाहली फजीती पुरती
अभयचंद, निर्भयचंद दोघांची झाली कीर्ती
त्या राजस्थानीं अजुनी पोवाडे त्यांचे होती

राणीचें तैसें शौर्य
गातात भाट कविवर्य
मी तसेंच करुनी धैर्य

काव्यांतुनि काढीं सूर— 'अर्गळची राणी शूर' !

## खेड्यांत संध्याकाळीं—

[ मंजरी ]

शनिवार दुपारीं पुणें शहर सोडुनी
खेड्यांत पोंचलों जाउन सायंतनीं
त्यासमयीं दिसुनी अपूर्व शोभा मला
आनंद मनाला कितीतरी जाहला !

रहदारी मोठी संपुनि शहरांतली
मोकळ्या रानची हवा मिळे मोकळी !
डोंगरापलिकडे अस्तवला भास्कर
कोवळें पीतमय ऊन खुलें भूवर !

चहुंकडे शोभती हिरवीं शेतें किती
शाळूचीं कणसें नागासम डोलती
ये आम्रतरूंना वासंतिक मोहर
दरवळे तयाचा सुवास वाऱ्यावर !

बाजूस नदीच्या कण्हेर फोफावली
तांबडीं पांढरीं फुलें तिचीं कोवळीं
उधळलीं नदीच्या पाण्यावर वायुनें
काढिला गालिचा काय सृष्टि-देविनें ?

सूर्यास्तसमयिं त्या नभीं पश्चिमेकडे
पसरले ढगांवर अनेकरंगी सडे
पांखरें उडत कोटराकडे चाललीं
आपल्या पिलांची ओढ तयां लागली !

घेऊन गुरांना आपआपल्या घरीं
गोपाल चालले वाजवीत पांवरी
गोठ्यांत वासरें हंबरती ह्या क्षणीं
भेटेल आपुली माय असें जाणुनी !

निज शेतावरुनी शेतकरी चालले
जल पिण्या नदीला बैल तसे धांवले
घुंघूर गळ्यांतिल वाजवुनी खळ्खळा
उडवून तयांनीं नभीं धुरोळा दिला !

झोंपड्यांत आतां सांजवात लागली
बेटांत किड्यांची किरकिरही चालली
पल्वलांत मंडुक ओरडती भेसुर
भुंकून राखती श्वान धन्याचें घर !

चावडीवरी ते जमून सगळे जन
घेतात विसावा करित गोड भाषण !
हीं मोहक दृश्यें खेड्यांतिल पाहुनी
राहतों वृथा शहरांत असें ये मनीं !

# सासुरवास अर्थात् सूनबाईचें गाणें

[ श्यामला ]

छि:थू किती ही सासरीं  जंजाळ तो वैऱ्यांपरी
लावी जिवाच्या कातरी  केलीं किती कामें तरी !

पोसावया जो ठाकला  पैसा असूनी नाडला
कन्येप्रमाणें सून ना  ह्या सासऱ्याच्या अंतरीं !

जैं लग्न झालें, तों धनी  ने काळ त्यांसी ओढुनी
'पाऊल माझें पांढरें'  हा काळिमा माझ्यावरी !

कामामधें कंटाळतां  पोथ्यापुराणें वाचतां
'बाहेर' किंवा हिंडतां  सासू धरी धारेवरी !

येवो दिवाळी, पाडवा  नाथां स्मरूनी खिन्न व्हा
माहेरिं ना धाडावया  पत्री कधीं कोणा खरी !

मिष्टान्न खाण्याला पुढें  ते मात्र 'वन्सं, भाउजी'
मी सेविका कामीं पडे  होऊन थट्टामस्करी !

सोसूं किती हें सासरीं ?  झाली मनाची खातरी
जो तो इथें इच्छा करी  'मज्जीव जावा सत्वरीं' !

# पुण्याचे भामटे आम्ही !

[ गज्जल ]

मवाली मुंबईचे ते नि सोदे दिल्लिचे नामी
जनीं प्रख्यात हो तैसे पुण्याचे भामटे आम्ही !

महाराष्ट्रामधें मोठें पुणें हें केंद्र विद्येचें
निवासी तेथले सारे अडाणी कोठुनी आम्ही ?

स्वतःला मानि जो तो कीं, खरा मी शाहणा मोठा
कधींही एकमेकांचें न देतों तें पटूं आम्ही !

अहा त्या 'सभ्य' नांवानें सदा ऐटींत वागून
बिचाऱ्या दीन लोकांना लुटूनी गांजतों आम्ही !

किती या आमुच्या लीला तुम्हां वर्णून सांगाव्या ?
न त्यावांचून कोणाला कळायाचें खरे आम्ही !

इथें गांवामधें साऱ्या विरोधी नांदती पक्ष
टवाळी एकमेकांची कराया शूर ते आम्ही !

जरी राष्ट्रामधें आलें घडूनी ऐक्य सर्वत्र
कराया त्यांवरी टीका निराळे राहतों आम्ही !

पुढारी अन्यपक्षाचा कुठें गांवामधें आला
जिवाला त्याचिया धोका प्रसंगीं आणितों आम्ही !

समाजाला सुधाराया खरा जो कष्टला पूर्वीं
जिता तो,— प्रेतयात्राही तयाची काढली आम्ही !

सभा राष्ट्रीय ती मोठी जहाली एकदां जेव्हां
अहा रंगामधें 'जोडा पुणेरी' फेंकिला आम्ही !

कधीं बाहेरुनी येथें नवा वक्ता कुणी आला
निघे जो नेभळा त्याला पुरा फेटाळतो आम्ही !

कवी काखोटिला बाडें कितीही मारुनी आले
कुठें गद्यांत ते गातां न देतो दाद त्यां आम्ही !

कितीही जाहिरातींनें कुणीं तीं नाटकें केलीं
जरा 'वेरंग' पाहूनी भजी त्यां मारतों आम्ही !

लिहाया लागला कोणी कुठें थोडेंहि अश्लील
बहिष्कारून त्यां शिक्षा कधीं ठोठावतों आम्ही !

कुणीं अस्पृश्यता जाया किती केले जरी यत्न
पुरूनी राहतों त्याला पुराणी सोवळे आम्ही !

कराया भाषणें मोठीं दणाणे आमुची वाणी
कृतीची वेळ येतांना मुकस्तंभापरी आम्ही !

समाजाला सुधाराया पुढारी होउनी कट्टे
कसा तो स्वार्थ साधावा पुरें हें जाणतों आम्ही !

कुणाला घालण्या टोपी, कुणाला पाडण्या खालीं
अनुल्लेखून माराया कुणां, निष्णात ते आम्ही !

जसा वाहील तो वारा मतें निर्माण तीं होती
निमालें ध्येय तत्रापी खरे मुत्सद्दि ते आम्ही !

पुण्याला ठेवुनी नांवें वृथा मारील जो थापा
तयाला चोंच माराया खरे ते कावळे आम्ही !

'कधींही आमुच्या नादीं बळें लागूं नये कोणी'
इषारा हा कसा द्यावा अरेरे शेवटीं आम्ही !

मवाली मुंबईचे ते नि सोदे दिल्लिचे नामी
जनीं प्रख्यात हो तैसे पुण्याचे भामटे आम्ही !

[ 'भामटे' म्ह. 'बनलेले' असाच अर्थ करावा. कवि हा सुद्धां पुण्याचाच आहे याची मात्र रसिकांनीं याद राखावी. ]

## बसली रंगमहालीं—

[ राग— चोरट देशी
चाल— दूति नसे ही माला ]

बसली रंगमहालीं गणिका ही मतवाली !
जगतीं आतां
वसुनि शांतता
मोठी रात्र जहाली गानीं ही पण घाली !

गाण्याचे स्वर
वायुबरोबर
पसरुनिया भंवतालीं माझी झोंप उडाली !

तिच्यासमोरी
माझ्या दारीं
रमलों मी त्या कालीं ऐकत गोड कवाली !

रूप तिचें तें
बघुनी गमतें
रंभा ही जणुं आली करण्या ख्यालिखुशाली !

हिच्या गायनीं
जिव वेडावुनी
भूकतहान पळाली      वृत्ति अशी मम झाली !

शेजारी जन
शंकुनि कां पण ?
करिती हाय टवाळी      मी 'तो बाहिरख्याली' !

अशा जनांतें
काय वदूं तें
सांग प्रभो तूं वाली      मी ठरलोंच मवाली ! !

# पंजरस्थ पक्ष्याचें स्वातंत्र्य-गीत

[ आनंद कंद ]

निर्माण देह झाला स्वातंत्र्य भोगण्याला !

रानावनांमधूनी
मम थोर पूर्वजांनीं
संचार स्वैर केला स्वातंत्र्य भोगण्याला !

सत्पुत्र मी तयांचा
पाईक मायभूचा
ये त्याच वंशजाला स्वातंत्र्य भोगण्याला !

चोहींकडे फिरावें
स्वच्छंद-गीत गावें
ठाऊक हीच लीला स्वातंत्र्य भोगण्याला

मी आज पंजरस्थ
झालों जरी निरर्थ
वश मी नसें कुणाला स्वातंत्र्य भोगण्याला !

आमीष दाखवून
केले जरी प्रयत्न
भुलणार ना कशाला स्वातंत्र्य भोगण्याला !

परकीय अन्न पापी
खाणार ना कदापी
झिजवीन जीवनाला स्वातंत्र्य भोगण्याला !

मज मारिलें कसेंहीं
मी ना गुलाम राहीं
माझाच जन्म सगळा स्वातंत्र्य भोगण्याला !

# सोनेरी टोळी

[ भूपतिवैभव ]

ही मानवते मज जन्मापासुनि टोळी
लाविते चटक कीं जशी अफूची गोळी !

जंगली पशूंची झुंड जशी फिरणारी
ही तशीच टोळी गुंड इथें बेकारी !

ठांसुनी, ठसवुनी, चोरुनि, योजुनि युक्ती
नाईक आमुचें खाद्य अम्हांला देती !

हें पोट भराया किती झगडती भाऊ
श्रीमंत पाहुनी हात तयांना दाऊं !

येथेंच निंद्य कृत्यांचे— घ्या धडे
मग कैदकाम करण्याला— व्हा खडे
गाजवा नांव टोळीचें— चहुंकडे

मग लोक गर्जतिल दुष्ट दुष्ट ती टोळी
जी पोटासाठीं चेतुनि देते होळी !

[ आचार्य अत्रे यांची 'माझी शाळा' आणि तेथें शिकत असतांनाच त्यांच्या कवितेवर ही 'सोनेरी टोळी' तयार झाली. उमाजी नाईक, तंट्या भिल्ल, बच्चा-इ-साकू हे जर आज हयात असते तर त्यांना ही कविता प्रार्थनेप्रमाणे वाटून मुलांच्या क्रमिक पुस्तकांत घेण्यासाठीं त्यांनीं ह्या कवितेची खास शिफारस केली असती ! पण त्याचें आतां काय ? नाहीं तो 'चान्स' आमच्या नशिबीं ! ]

# मयूरा !

[ आनंद कंद ]

तें नत्य गोड आतां    तूं नाच ना मयूरा !
मी ये तुझ्या ठिकाणीं
जग शून्य हें त्यजूनी
मज द्यावयांस थारा    तूं नाच ना मयूरा !
मी त्रासलों जिवांसी
ना शांतताच त्यांसी
रमण्यांस जीव सारा    तूं नाच ना मयूरा !
त्या गोड गोड ताना
गानांत तूंच गा ना ?
फोडून कंठ प्यारा    तूं नाच ना मयूरा !
डोळे दिपावयाचा
नवरंगिं नर्तनाचा
फुलवोनिया पिसारा    तूं नाच ना मयूरा !
लावण्ययुक्त ऐशी
लांडोर नार तूझी
निज घेउनी समोरा    तूं नाच ना मयूरा !
तूं दास शारदेचा
मी वांछितोच तैसा
नेण्या तिच्याच दारां    तूं नाच ना मयूरा !
तूं नाचल्याविना मी
जाणार ना कुठेंही
झणिं देउनी रुकारां    तूं नाच ना मयूरा !

# जाहीर सभा

[ झाल्या तिन्ही सांजा ]

[ शहरांत सभा भरविणाऱ्या एका चालकाचें मनोगीत ]

अजुनि कसे येती ना   नागो, नरसोबा ?
वेळ सरे, होइल कां   नाहीं आज सभा ?

उशिर होइ जमुनींया   लोकांचा मेळा
गोपिनाथ, गंगाधर   झुलती कामाला
बसतिनि ते लोक जरी   माजतसे तोबा
वेळ सरे, होइल कां,   नाहीं आज सभा ?

जागा ती भव्य कुठें   नेमुनि जी दिधली
विषय छान ऐकतांच   गर्दी बहु झाली !
शिस्तीचा कोणावर   नुरला मग ताबा
वेळ सरे, होइल कां   नाहीं आज सभा ?

हंसविणार कादरखां   भाषण तें करुनी
रसिकांना रिझवाया   बिजली ये सजुनी !
बोलण्यास इतरां जरि   होती आज मुभा
वेळ सरे, होइल कां   नाहीं आज सभा ?

ओसरल्यावर गर्दी मौज न ती कसली
अधिपति पण जोडी कां अन्य सभेंत रमली ?
दारावर वाट बघत कुठवर राहुं उभा ?
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?

पुटपुटला तो मिशाळ अशुभ इथें कसलें
अंत्यविधीस्तत्र दोघे जातांना दिसले !
राख अतां तूंच लाज माझी जगदंबा
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

जाहीर सभेंतील पात्रें—

नागो— स्वागताध्यक्ष

नरसोबा— अध्यक्ष

गोपिनाथ, गंगाधर— व्याख्यात्यांची जोडगोळी

कादरखां— मुख्य वक्ता

कु. बिजली— काव्यगायिका

मिशाळ— एक मास्तर

जगदंबा— संकट निवारणारी देवी !

# तुझें प्रेम

[ मालकंस ]

जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?
तुझी लागली मज्जिवांला खुमारी !

तुवां मोहिनी घालतां मन्मनाला
तुझ्या प्रेमगानांमधें जीव धाला
अहोरात लागे तुझें वेड भारी
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

किती कष्टलों मी न सीमा कशाची
तशी बाळगीली न पर्वा धनाची
तुझ्याकारणें जाहलों मी भिकारी
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

अहा प्रेमपत्रें किती धाडुनीया
तुझी भेट मी वांछिली नित्य व्हाया
तुला गांठलें मी घरीं आणि दारीं
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

नव्या भेटवस्तू सदा आणवूनी
घरांला तुझ्या मी दिल्या पाठवूनी
तयांची स्मृती घेउनी तूं विचारीं
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

बळें सोडुनीया स्वतःच्या घरांला
समोरा तुझ्या पातलों राहण्यांला
तुझी घेतली दर्शनें लाखवारी
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

तुझ्या धाकट्या बंधुशीं सख्य केलें
कितीदां तयां बोल-चित्रांस नेलें
तुला बोलवीलें न तूं घे भरारी
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

तुझ्या गे तनूच्या प्रतीमा सुरेख
तुला चोरुनी काढिल्या मी अनेक
किती पाहुनी त्यां धरूं मी उभारी
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

गझल्प्रेमकाव्यें तुला आळवूनी
अतोनात केली मनीं मी झुरूनी !
तयां जाळण्याची करूं कां तयारी ?
जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?

कशी दुर्बळाची तुला कींव ना ती ?
करूं आत्महत्या अतां काय अंतीं ?
नसें पाप मातें तुला तें कुमारी
करी कांहिं हा जीव तूझ्या अहारीं !

जडेना तुझें प्रेम कैसें कुमारी ?
तुझी लागली मज्जिवांला खुमारी !

## ऑफिसास निघतांना—

[ भूपतिवैभव ]

“चल, सोड राजसा ! सोड जाउं दे मजला
तुज कसें नाकळे कोण वेळ हा कसला ?

कामास बोलवी कजाग सासू मजशीं
ही अवेळ जरि तूं कवटाळूनी बसशी !

चल सोड मिठी ही पुरेत गुलगुल गोष्टी
किति चालविशी तूं अजुनी चुंबनवृष्टी ?

ती हांक ‘राक्षसी’ धारेवर धरणारी
जाळितें जिवाला गमलें जर मी भारी !

बघ काम किती तें सारें– राहिलें
बोलेल काय जर कोणीं– पाहिलें ?

चल सोड एकदां, जाउं कशी दे मजला
होतो न कसा तुज उशीर ऑफीसाला ?”

# ऑफिसांतून आल्यावर—

[ बालमुकुंद ]

मम सखी जिवाची दिसली कां रे तुला
कशि घरांतुनी मला सोडुनी जाइ बरें आजला ?

टोंचून बोललें तिला आज कां कुणी ?
कां हट्ट न देतां तिचाच मी पुरवुनी
ती माहेराला गेली रागावुनी
मम जीव तिच्यास्तव वेड्यासम जाहला !

रेखीव तिची ती सख्या किती राहणी
संसार कराया गृहलक्ष्मी ती गुणी
सौंदर्ययुक्त ती लावण्याची खनी
सहवास सारखा हवा तिचा वाटला !

नेसतां गुलाबी पातळ ती भर्जरी
ब्लाऊझ तयावर तंग निळा कास्मिरी
अप्सराच तेव्हां भासुनि सुख-निर्झरी
हव्यास तिच्याविण अन्य न कधिं लागला !

मम स्वारी येतां घरीं हपीसांतुनी
जरि सुकुनी जाई 'कळी' वाट पाहुनी
मज आलिंगूनि खुलते 'ती' तत्क्षणीं
पण कुठवर लोटूं काळ अतां एकला ?

# होशिल मम सांग कधीं—?

[ महाराष्ट्रगीतासारखी ]

जीवनांत यावयास सुरस माधुरी
होशिल मम सांग कधीं हृदयसुंदरी ?

कमलकळी भ्रमराला मोह पाडिते
कोमल तनु गौर तुझी वेड लाविते
स्वर्गांतिल भासतेस दिव्य तूं परी
होशिल मम सांग कधीं हृदयसुंदरी ?

तरतरीत तेजस्वी लोचनांतुनी
गहिरी ती चमक कशी राहि सांडुनी ?
मृगनयना गमशी तूं भववनांतरीं
होशिल मग सांग कधीं हृदयसुंदरी ?

चंद्राला लाजवील रम्य मुख तुझें
मधुर हास्य तोषवील भग्न जीव जे
मोहक तूं हंसणारी गोड निर्झरी
होशिल मम सांग कधीं हृदयसुंदरी ?

हंसीसम चालतेस डुलत हळुं किती
निर्मळ मन दर्शवि कां सरळ चाल ती !
नौका कीं शांत फिरे लोकसागरीं
होशिल मम सांग कधीं हृदयसुंदरी ?

तनुलतिका नवतीचा बहर घे नवा
भूवर कां येइ रती खावया हवा ?
शोभशि तूं जेंवि कमलिनी सरोवरीं
होशिल मम सांग कधीं हृदयसुंदरी ?

दीपकळीवर पतंग जाइ मोहुनी
वेडें मन होइ तसें तुज विलोकुनी
प्रीतीला देशिल तूं प्रीति कां खरी ?
होशिल मम सांग कधीं हृदयसुंदरी ?

ओढ तुझी लागुनि हा जीव भागला
होइल कां लाभ तुझा सत्वरीं मला ?
मैनेस्तव पोपट हा झुरत अंतरीं
होशिल मम सांग कधीं हृदयसुंदरी ?

भेटण्यास आतुरते सागरां नदी
वृक्षाविण आश्रय ना वेल घेत ती !
कुठवर तूं राहणार एकटी तरी ?
होशिल मम सांग कधीं हृदयसुंदरी ?

# मावशीची आठवण

[ गज्जल ]

[ स्थळ— अन्नपूर्णाभोजनालय– प्रो. मावशीबाई ]

जेवण्या जों मावशी गे ! दार तूझें गांठलें
तोंड तूं जें चालवीलें मी दडूनी ऐकिलें !

सोवळ्यानें तूं चुलीशीं बैसुनी स्वैंपाक्घरीं
तूं उपाशी रागवीशी ऐन बारा वाजले !

भाकरीचें पीठ थाळीं झर्झरा त्या थापुनी
फुंकुनीया फुंकणीनें इंधनां तूं निंदिलें !

तांबड्या रंगांत शोभे 'सोवळें' अंगावरी
लाल झालेल्या मुखाला लाजवाया नेसिलें ?

'साफ' केल्यानें चकाके आरसा डोक्यावरी
शंकराचार्यांस येथें आज वा पाचारिलें ?

मोकळ्या शीर्षावरी गे ! बिल्वपत्रासारखें
लावुनी लोणी कशाचें पान होतें ठेविलें ?

थांबलों ओशाळुनी अन् चोरुनी मी ये पुढें
नाद तों ये 'धप्प' कानीं काय झालें पाहिलें !

थापणें जोरांत चाले त्याच नादीं रंगलों
तोंडही ना ये धराया स्वैर तूं जें सोडिलें !

'थापतांना भाकरी तूं तोंड सोडावें खुलें
चोरुनी ऐकून मीही तृप्त व्हावें'– वांछिलें !

तोंच येई श्वान तेथें ! भाकरी ने ओढुनी
शूर तूं शासावया त्या शस्त्र तेव्हां शोधिलें !

मारण्यासी फेंकिली तूं ती चुकूनी फुंकणी
खोंक पाडी मात्र मातें खूण राही त्यामुळें !

अजून जोंपर्यंत विधवांच्या केशवपनाची दुष्ट चाल बंद झाली नाहीं तोंपर्यंत वरील कवितेच्या कांहीं ओळींत नको असलेलें भलतेंच वर्णन आहे अशी सनातन्यांनीं ओरड करण्यांत काय अर्थ आहे ?

# कुंजवनांत—

[ बालानन्द ]

चला चला ग कुंजवनीं    जाउं सख्यांनो सर्वजणी
वसंतऋतुचा हा काल    नच टिकणारा चिरकाल
जिकडे तिकडे वर खालीं    सृष्टी चैतन्यें सजली
हिरवीं रानें सृष्टीचीं    शोभुनि सुंदर पांचूचीं
वहात त्यांवर निर्झर ते    करिती तांडवनृत्यातें
स्वच्छंदी त्यांचें गान    विहगांचें रमवी भान
वेडावुनिही ते सारे    उडुनी गाती प्रेमभरें
फूलपांखरें स्वच्छंदी    सुंदर साधुनि ही संधी
फुलझाडांवरती भ्रमुनी    गाणें गाती गुणगुणुनी
सेवुनि मकरंदा तैसें    गुंजन चाले भ्रमरांचें !
कोकिलकूजन संतत तें    काय सांगतें जगतातें ?
'वसंत आला हो आला    त्रास कशाचा ना उरला
जिकडे तिकडे मोद करा    आनंदानें विश्व भरा' !
स्वस्थ न आपणही बसतां    लगबग करुनी ग आतां
मौज कराया सर्वजणी    जाऊं चला ग कुंजवनीं !

मांगल्याला ये भरती    सृष्टिसती ही आनंदी
प्रभातकालीं सुंदरशा    उजळुनि गेल्या दाहि दिशा
जाइजुईंच्या फुलवेली    बहरुनि सजल्या ह्यावेळीं

सुवर्णचंपकही फुलला गुलाब हांसत तरवरला
हिरमुसलेल्या सर्व कळ्या उमलुनि झाडांवर खुलल्या
लहान फुलझाडांवरती रानफुलें हंसती डुलती
भणभण वारा तो सुटला ताळ न कसला त्या उरला
रानफुलें तो तोडून चोंहिंकडे दे उधळून
मधुर सुगंधित वास भला वनावनामधुनी भरला !
गोड फुलें प्राजक्ताचीं गळुनि आतां झाडांवरचीं
भूमीवरतीं चोंहिंकडे पडले त्यांचे बहुत सडे
परड्या घेउनि हातांत चला सख्यांनो रानांत !
फुलें सर्व तीं आणूं या प्रभुचरणांसी वाहूं या
कोणी गुंफा ग माला प्रियकर अपुल्या कृष्णाला
गजरे, वेण्या कुणी करा घालुनि डोक्यामधें फिरा
उधळित कोणी सुमनांना खूष करा वनराणींना
वेळ पुन्हां नच येईल फुलें अशीं नच मिळतील
सार्थक त्यांचें करूं चला पाय सख्यानो ग उचला
कुंजवनीं तो कृष्णसखा बघतो अपुली वाट न कां ?

उदयगिरीशिखरामागें अरुण डोकवी अनुरागें
हांसत गालीं हळुवार पूर्वदिशा नटली फार
सुंदर सोनेरी किरण क्षितिजाची कड रंगवुन
उंच उंच वृक्षांमधुनी तेज आपुलें उधळूनी
वसुधेच्या अंकावरती नाचत करती खेळ किती
दंवबिंदू त्यांना भ्याले सत्वर लोपुनिया गेले !
स्पष्ट दिसे नयनांस अतां भव्य गिरींची सुंदरता
वहात झाडींतून नद्या कड्याकड्यावर घेति उड्या

रम्य उंच हीं गिरिशिखरें स्पर्धा कसली करिति बरें ?
नील नभा तीं भेटाया झटती, पण सारें वांया !
मेघांच्या सुंदर पंक्ती नभांत त्यांच्यावर फिरती
लपंडाव त्यांचा खेळ सुरू जहाला किति वेळ
शिवाशिवी कोणी खेळे नाचत फिरती कुणी खुळे
गुलाल रंगित पिचकारी अरुण तयांवरती मारी
रंगपंचमी नित्य अशी नभांत चाले सुंदरशी
खेळ मजेचे त्यांसम ते भूवरती खेळायातें
नटुनी, थटुनी सर्वजणी जाऊं चला ग कुंजवनीं !

कुंजवनीं अपुला कान्हा घेउनिया प्रिय मित्रांना
यमुनेकांठीं ह्यावेळीं सुरेल वाजवितो मुरली
ऐकुनि मुरलीचे नाद यमुनाजल झालें शांत
गोपांची वृत्ती रिझली भूकतहानहि त्यां नुरली
चरावयाचें सोडून गायी झाल्या तल्लीन
गोजिरवाण्णीं वत्सें तीं दुडुदुडु धांवत वागडती
जलचर प्राणी नदींतले पशुपक्षीही वनांतले
मुरलीचे स्वर ऐकून निश्चल होती गुंगून
गिरी आणखी दरींतुनी मुरलीरव जाई घुमुनी
सर्वांना जिकडे तिकडे मुरलीनें केलें वेडें
मुरलीचा एकच सूर दुःखांचा करितो चूर !
चला चला ती ऐकाया वेळ नका दवडूं वांया
गोपी तुम्ही कृष्णाच्या दिव्य तारका गगनाच्या
कृष्णचंद्र तुमचा प्यारा त्याच्याभंवतीं फेर धरा
वाजवुनी टिपरी कोणी गा ग प्रेमाचीं गाणीं

जमवुनि गोपांचा मेळा गोफ कुणी बाई खेळा
उधळित कोणी सुमनांना झोल्यावर घ्या झोक्यांना
फुगड्या, झिम्मा खेळून टाका वन हें गर्जून !
गुंफुनि कोणी वनमाला गळयांत कृष्णाच्या घाला
हृदयांतिल सारी प्रीती द्या ग जडूं कृष्णांवरतीं !
तोहि तुम्हांला रिझवील मनोरथांना पुरवील
आनंदित तुम्हां बघुनी सर्व देव स्वर्गांमधुनी
बसुनि विमानीं फिरतील खूष तुम्हांवर होतील
करतिल पुष्पांची वृष्टी पुनीत होइल मग सृष्टी !

# मर्द मराठ्यांस —

[ प्रणयप्रभा ]

चल, ऊठ मराठ्या ! ऊठ झणीं
तूं टाक उडी स्वातंत्र्य-रणीं !

स्वतंत्र भारत करावयाला
तोंड लागलें बघ युद्धांला
स्वस्थ कसा तूं ह्या समयांला ?
रणनौबद झडली ऐक जुनी !

सुवर्णसंधी पुन्हां न येइल
गमावतां तूं हळहळशील
शंका तर टाकूनि मनांतिल
घे शपथ पूर्वजांतें स्मरुनी !

भवानिचें अभिवंदुनि चरण
शिवरायाचें करुनी स्मरण
गनिमी बाणा तो आमरण—
लढविण्या, शिपाई हो सजुनी !

परदास्यीं हा देश बुडाला
उपहासें जग हंसतें त्याला
चीड न ह्याची कैशी तुजला ?
  कां गुलाम होशी तूं जगुनी ?

अमेरिकेच्या पहा समान
स्वतंत्र झाला देश जपान
इटलीलाही तैसा मान
  करि मुक्त भारता तूं अजुनी !

मर्द मराठ्याचा तूं छावा
राष्ट्रध्वज गगनीं फडकावा
प्राणहि तूं त्यास्तव वेंचावा
  का हवी तुला रे चेतवणी ?

चल ऊठ मराठ्या ! ऊठ झणीं
तूं टाक उडी स्वातंत्र्य-रणीं !

# आजचें रणकंदन

[ केशवकरणी ]

सांप्रत समयीं नव्या मनूचें ठाके रणकंदन
तयाचें गातों मी वर्णन !
शंभर संवत्सरें जहालीं स्वतंत्रता सांडुन
हिंद हा परक्यांनीं पीडुन !
पक्षापक्षामधें माजले कलह किती त्यांतुन
नांव तें एकीचें कोठुन ?
जिकडे तिकडे चोंहिकडेही खेड्यां-शहरांतुन
राहिली बेकारी वाढुन !
सुखशैलाच्या शिखरावरुनी धनीक धडधाडुन
थडकले दुःख-दरीं दारुण !
दैन्यावस्था थोरांची तर कोण गरीबांवर
घालतो प्रेमाची पांखर ?
अन्नाला मोताद जाहले वस्त्रांसहि नाडुन
भिकारी जिवास कंटाळुन !
शेतावरच्या शेतकऱ्यांनीं शेतभात सोडुन
गांठल्या गिरण्या गांवांतुन !
उरले सुरले शेतकरी ते मेले मरणाविण
व्याज तें धनकोचें फेडुन !

कित्येक तयांतिल लागुनि देशोधडी
घरदारां मुकुनी बसले घेउन दडी
निष्ठूर काळ हा बदलुनि देतो घडी !

स्वतंत्र आणिक सुवर्णभूमी देश जिथें गाजला
तयाची काय स्थिती आजला ?

*    *    *

कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णांनीं गीता ती गाउन
ठेविलें काय सूत्र कोरुन ?
"अधर्मकाळीं भक्तासाठीं अवतारी होउन
करितों धर्मप्रस्थापन !
दैत्यकुळांचा नाश कराया साधूंच्या हातुन
पेरितों स्वतंत्रतेचे कण" !
सद्यःस्थितिंतुनि साधु 'महात्मा' देई त्याची स्मृती
करूनी स्वातंत्र्याची कृती !
देशासाठीं, धर्मासाठीं फकिरी स्वीकारुन
जयाचें झालें सर्वार्पण !
धन्य तयाचें— त्या शूराचें— शांतीचें धोरण
भिनलें प्राणीमात्रांतुन !
स्वातंत्र्यास्तव कारागृह तें होऊन वृंदावन
रहाया जाती तेथें जन !

त्या वृंदावनिंचा कृष्ण खरा 'मोहन'
ती 'असहकारिता' गीता नव काढुन
टाकितो हिंदभू सारी वेडावुन !

कंसवधासम परवशतेचें कालीयामर्दन
करिल तो आज उद्यां ना पण !

# भेट ती होणार केव्हां– ?

[ गज्जल ]

भेट ती होणार केव्हां सांग तूझी सुंदरी ?
दर्शना आतूर झाला जीव हा वेड्यापरी !
कैक वर्षें लोटलीं तीं पाहुनीया मी तुला
हांसरी गे मूर्त तूझी खेळते ह्या अंतरीं !
मोहुनी जेव्हां तुला मीं सर्व माझें अर्पिलें
सज्ज तूंही जाहली ना प्रेम द्याया सत्वरीं ?
हाय ! मागाहून आलें काय तूझ्या मानसीं
ठेविला संबंध माझा तूं न तो पूर्वींपरी !
बेइमानी तेरडा तो रंग जैसा पालटे
प्रेम तैसें दाखवीलें कां अशी तूं नाचरी ?
तूंच ओठीं लाविण्याला प्रीत-पेला घेतला
दूर तो लोटून देशी रीत का गे ही बरी ?
गूढ साधें मन्मनाचें नाकळे कैसें तुला
प्रेममूर्ती एक माझी आणि ती गे तूं खरी !
गांठ आतां द्यावयासी तूं कितीही टाळलें
सागरावांचून भेटे का नदी कोणातरी ?

# मास्तर आणि मुलें

[ शार्दूलविक्रीडित ]

वेडा तो दिसला सुशिक्षित कुणी बेकार होऊनिया
वर्षें कैकहि जाहलीं तरि मिळे ना कामधंदा तया !
छोटया त्या शहरामधें रखडुनी तो आक्रमी जीवित
गांवांतील मुलें उनाड सगळीं होतीं मजा मारित !
दंगेखोर मुलें जमूनि वदलीं वेड्यास तीं एकदां—
'वेडा माणुस तूं ! अरे न अगदीं कांहीं तुझा फायदा' !
रागावून तयांस तोच वदला—'कां ही मला टोंचणी ?
सारा हूडपणा तुम्हांस तुमचा जाचेल मोठेपणीं' !
वेड्याच्या परि अंतरांत भिनले ते शब्द वीषासम
रात्रंदीस उपास त्यांत घडुनी तो जाहला निष्प्रभ !
पोरांच्या मनिं-मानसीं न ठसलें तें वेडप्याचें वच
त्यांचा हूडपणा थरास भिडुनी थांबे न तो कांहिंच !
गांवीं त्याच तदा धनाढ्य न कळे येई कुठूनी कुणी
पोरें तेथ बघून, छान सुचली युक्ती तयांच्या मनीं !
पैसा खर्चुनिया इमारत तयें शाळेप्रती बांधली
वेडा मास्तर तो तिथें कशितरी त्या नोकरी लागली !
आपोआप तिथें कुणी 'मिशनरी' येई प्रचारास्तव
शाळा ती बघतांच त्यास फुटला आनंददायी द्रव !
गांवांतील मुलें तयें भुलवुनी शाळेमधें आणलीं
हर्षा पावुनि तीं कधीं न चुकतां येऊं तिथें लागलीं !
शाळा ती नयनां अतां दिसतसे गांवांत उत्कर्षत
वेडा मास्तर तो मुलांवर ठरे आचार्य नामांकित !

## बुरखेवाला

[ मनमोहन ]

त्या टोपणनांवाखालीं करसी टीका कां चोरून ?
प्रगटुनीया नांव सारें
तूं झणीं बाहेर ये रे
ये जेवि मल्ल तो फडामधूनी दंड स्वतः ठोकून !
नांवरूपा यावयातें
बहकशी ना नित्य खोटें ?
सज्जनांपरी तो स्वार्थी ढोंगी राहिल काय टिकून ?
घेउनी साहित्य परकें
मारितोसी व्यर्थ फटके
आयत्या बिळावर नागोबाचें जाइ खरें फावून !
अंतरंगीं द्वेष भिनला
व्यर्थ जरि तो माजवीला
कां काकशापें पवित्र धेनू जातिल सर्व मरून ?
नित्य घेशी भिन्न नांवें
कळुनि कोणा कीं न यावें
परि बिंग खरें तें कधींतरी ना जातें पार फुटून ?
हंस पक्षी मूक प्राणी
दूध घेती जल त्यजूनी
निर्दयी मनुज तूं दोषां धरिसी गूण मात्र सोडून !
राहुं दे अस्तित्व तूझें
वचन परि हें जाण साचें—
'भुंकलें श्वान तें तरी न पाहे गज त्याला ढुंकून' !

# पाहूं किती वाट— ?

[ छंद– चंद्रकांत. चाल– 'तेढ'-गिरीश ]

झाली मोठी रात तरी पाहूं किती वाट ! बाई
पाहूं किती वाट ।
अजूनी रे सख्या ! तुझी नाहीं कशी गांठ ! बाई ॥

येशील तूं म्हणून मी सजें आटोकाट । बाई
रोषनाई त्यांत केली सर्वत्र अफाट । बाई ॥

भरज्वानींतील माझा वर्णूं कसा थाट । बाई
सुखासाठीं वाढवीला स्नेह तूझा दाट । बाई ॥

तूझ्यावीण नाहीं मज जगीं पळवाट । बाई
तार किंवा मार तूंच जिवाचा सम्राट । बाई ॥

रात्रंदिन तूझ्यास्तव झालें मी पिसाट । बाई
हृदयांत उसळतें प्रणयाची लाट । बाई ॥

तूझ्या आज अंतरींचा कळत न घाट । बाई
कोठवर उभी अशी राहूं मी मुकाट । बाई ॥

लावुनी तूं माया जर दाखविली पाठ । बाई
मृत्यू वरीन मी पण नको पीछेहाट । बाई ॥

## तुझें हें रूप पाहूनी—

[ वसंत ]

तुझें हें रूप पाहूनी स्वतः मीं कां न भाळावें ?
मनाला मोहिनी पडतां तुला मीं कां न झुलवावें ?

भरज्वानींत नवतीचा तुझ्या देहीं खुले रंग
बघूनी भृंग कमळातें कसा होणार ना दंग ?

विलासी तेज शुक्राचें तुझ्या तोंडावरी खुलतें
चांदणें पौर्णिमेचें तें तसें तव हासणें गमतें !

मृगाच्या लोचनांसम का तुझे ते चमकुनी डोळे
बघूनी भूवरी वाटे करी सौदामिनी चाळे !

धनूच्या आकृतीसम गे तुझ्या त्या भोंवया दोन्ही
तयांचा नाच तो फक्त करावा सिंधुलाटांनीं !

कळी ती सोनचांफ्याची तुझी ती नासिका नीट
हिऱ्याची त्यामधें चमकी चकाके चांदणी थेट !

खुले पाठीवरी रुळती उडूनी केस ते काळे
कुणाला गुंतवायासी तुवां का टाकिलें जाळें ?

गुलाबाचीं फुलें फुललीं तुझ्या गालांवरी पूर्ण
किती ओठांवरी नामी खुले आरक्त सौवर्ण !

कटी बारीक सिंहाची वरी रुंदावुनी छाती
अहा ! वक्षस्थलीं राघू सुखानें दोन ते रमती !

कपाळीं दोन भुवयांच्या कमानीं तांबडी टिकली
बिचारा तीळ हिरवासा सुशोभे एक त्या गालीं !

तुझे ते कोवळे ओठ जणूं कीं देठ प्राजक्ती
अनाराचे तसे दाणे तुझे ग दांत ते खुलती !

अती नाजूक केळीचे उभे तें दोन तव पाय
कराचीं कोवळीं बोटें लता-पानें म्हणूं काय ?

शुभांगी रूपसंपन्ना खरी तूं मोहनाराणी
वनीं ती केतकी जैशी गुणाची तूं तशी खाणी !

पथीं तूं चालतां हाले तुझें तें लवलवा अंग
झकाके रेशमी साडी तशी ती कंचुकी तंग !

मनाची कल्पना तुझ्या करावी मीं कशी वाचे ?
परंतू स्वच्छ नी शांत गमे तें नीर गंगेचें !

बघूनी कोर चंद्राची हृदीं तो सिंधु हेलावे
तुझें हें रूप पाहूनी तुला मीं कां न भाळावें ?

# लोपलें सौंदर्य कोठेंसें जरा—

[ गजल ]

लोपलें सौंदर्य कोठेंसें जरा
सोडुनी जाशी कसा तूं सुंदरा ?

रूपसौंदर्यावरी ह्या भाळुनी
स्नेह केला तूंच आधीं ना खरा ?

पाहुनी मज्जीव भोळा भाबडा
प्रीत-जाळें टाकिलें तूं धीवरा !

मोहिनी तूझी पडूनीही मला
तूजसंगें नाचलें मी पांखरा !

लाभलें सत्सौख्य तूझ्या संगतीं
कीं धरेच्या स्वर्ग तो येई घरा !

चंद्रिका ती हासरी मी शोभलें
प्रीतिचा सिंधू तुझा आला भरा !

चालला ऐसा सुखानें काल जों
दैव योजी त्यांत कां न्यारी तऱ्हा ?

रुग्णशय्येनें जिवाला घेरिलें
हांसरा तो राहिला ना चेहरा !

लोपतां सौंदर्य थोडें त्यांतुनी—
सोडिला तूं ह्या घराचा उंबरा !

काय लीला ही तुझी भुंग्यापरी
जीव माझा हो तयानें घाबरा !

चूक माझी यांत कोठें जाहली
आटुनी कां देशि प्रीतीचा झरा ?

प्रेम माझें ना कसें तें ढासळे
तूंच माझ्या अंतरींचा मोहरा !

प्रीतनौका जीवनाच्या सागरीं
लोटुनी जाशी कसा रे दिल्वरा ?

फीर माघारीं नको जाऊं कुठें
आवडे साधी नदीही सागरा !

त्याग वेलीचा करी का वृक्ष तो ?
नित्य तूं देशी न कैसा आसरा ?

# पाऊस पुरवला !

[ मंजरी ]

विसरलों घरांतुन छत्री मी घ्यावया
पाऊस भयंकर लागे तो यावया !
राहिलों उभा मी रस्त्याच्या बाजुस
पाहात वाट,–थांबेल कधीं पाउस.

इतुक्यांत न कळतां 'माडी'वरुनी कुणी
थुंकिला तांबडा लाल विडा खाउनी !
त्या पिचकारीनें कपडे मम रंगलें
जें नको कसें तें नशिबाला लागलें !

बोललों मनाशीं निघतां अणि तेथुनी–
पाऊस पुरवला, 'लाल निशाणी'हुनी !

# दुर्दशा ही भारताची—

[ गजल ]

दुर्दशा ही भारताची पाहुनीया संप्रती
जीव माझा पोळुनी कां नेत्र हे भारावती ?
लोपुनी स्वातंत्र्य आतां घोर आलें दास्य कां ?
आंधळी सत्ता करी विध्वंस सारी संस्कृती !
चेतना जाज्वल्य गेली देश हा मागासला
शूर मोठ्या पूर्वजांची जाहली का विस्मृती ?
दास्यरूपी जूं तथापी स्वार्थवृत्ती माजली
ऐक्य लोपूनी जनांचें थांबली ती उन्नती !
भिन्न झाले पंथ त्यांची जूट नाहीं ती कुठें
'सूज्ञ जो तो' ना जुमानी एकमेकांची कृती !
जातिभेदाचें वृथा तें खूळ गर्जे त्यांतुनी
'उच्च मी, तूं नीच' ऐशीं भांडणें थैमानती !
'खाण सोन्याची' म्हणूनी हिंदभू जी शोभली
पारतंत्र्यें गांजुनीया हो भिकारी आज ती !
द्रव्य जाई अन्य देशीं लक्ष नाहीं आमुचें
राबती जे दीन त्यांची ना कधीं होते स्मृती !
संस्कृतीची राळ झाली धर्म नाहीं राहिला
स्वाभिमाना सोडुनीया शिस्त सारे भंगती !
मातृभूमी उद्धराया रक्त ज्यांनीं सांडिलें
मर्द ते कोणीकडे ज्यां प्राप्त झाली सद्गती !
पापभीरू लोक आम्ही शौर्य आतां कोठलें ?
ही स्थिती जाणार केंव्हां नाकळे ह्या संकटीं !

# घे सुरी—

[ अवनी ]

घे सुरी नि मार उरीं, डाव अतां साधीं !
  विकत मला आणियलें
  हौसेनें बाळगिलें
ना कळला हेतु तदा काय तुझा स्वार्थी ?

  अड्यांना आजवरी
  जन्म दिला कितिक तरी
भ्रांत पडे कधिं न तुला व्हावयास प्राप्ती !

  ऐकुनि मम सूर एक
  उठति पहांटेस कैक
लोककार्य आचरण्या यापुढें न हातीं !

  मनुजाचा बुद्धिभ्रंश
  मूकप्राण करित नाश
'गरज सरो वैद्य मरो' हीच काय नीती ?

  चरचर हा चीर देह
  मांसाचें अन्न सेव
मन निवेल पाहुनिया झालि तुझी तृप्ती !

प्रो. मायदेवांनीं 'घे कुठार, कर उगार' म्हटल्यावर मलाही 'घे सुरी नि मार उरीं' म्हणण्याची दुष्ट (!) बुद्धि कां बरें व्हावी ?

# चोर, साहित्यसेवक आणि मिशा !

[ मोहिनी ]

घोर रात्र वघुनी माझ्या येउनी घरास
दागिने प्रियेचे चोरा काय चोरलेस ?

कसे दिवस कंठीं मी हें एक देव जाणे
प्रिया त्यांत श्रीमंताची मिळे नशीबानें
विवाहांत तिचिया दिधले दागिने पित्यानें—
हिरावून कां मम जीवा फास लाधिलास ?

नेमका कसा तूं येशी माझिया घराला
विश्व ओस पडलें होतें काय लुटायाला ?
'चोर जाणतो चोरा' हें तत्त्व पटविण्याला—
'लेखनांत करिं मी चोरी'-म्हणुनि गांठलेंस ?

स्त्रीधनाविना ना तुजला अन्य सांपडावें ?
मिरविण्या सखीनें आतां सांग कसें जावें ?
हाय ! दागिने मीं तैसे कोठुनी करावे ?
कडाडेल वीज तिची मी साहुं कसा त्रास ?

शूर कां असूनी नेशी दागिने सखीचे
जाड आंकडे तुज दिसले का न मन्मिशीचे ?
मिशा पार नेतां,—वदते सनातनी वाचे—
'आइबाप गेले म्हणुनी सुतक मला खास' !

# मानीन तुला मी अपुली—

[ गज़ल ]

रानांत इथें राहुनि अज्ञात ठिकाणीं
कां होइ दशा सांग तुझी केविलवाणी ?
साम्राज्य खुले चौंहिकडे शांत वनाचें
त्यांतून हवी नित्य तुझी गोड रहाणी !
ह्या ऐन वसंतांत सजे सुंदर सृष्टी
आनंद लुटाया सगळे आतुर प्राणी !
खेळे न तुझ्या तोंडावर हास्य परंतू
कां म्लान तुझी मूर्त दिसे गोजिरवाणी ?
ना कांहिं कमी येथ तुला माळवनांत
दारांत तुझ्या श्री भरते संतत पाणी !
तूं भासशि सर्वांस सुखी पूर्ण वरून
गातेस परी हाय मनीं दुःखद गाणीं !
जें दुःख तुझ्या जाळतसे पार जिवाला
ओकून कमी तें करण्या सांग कहाणी !
तूं लाजशि कां सांग उणें जें तुजलागीं
राहून उगी नासुं नको ती जिनगाणी !
सौंदर्य तुझें वेड मला लावुनि टाकी
तव बालपणांतील न मी मित्र अडाणी
तूं व्हावं सुखी प्रेम तुझें अर्पुनि मातें
मानीन तुला मी अपुली राजस राणी !

# पिंजऱ्यांतील मैना

[ वसंत ]

परीक्षा तूं किती घेशी ? पुरे, हा पिंजला जीव
सख्या ! दे सत्वरीं तूझ्या दिलाची काय ती हांव !

तिथीमागें तिथी येते कळेना वर्षही जातें
कुडी कौमार्यतेचीं ह्या न आतां साहवे मातें !

किती मीं होउनी कष्टी झुरावें तूझियासाठीं ?
कराया सक्ति ना येई (वृथा होईल हाकाटी !)

जिवाला लावुनी नादीं नको जाऊं बरें नाट
कळेना अंतरीं तूझ्या असे तो कोणता घाट ?

किती मी सौंगड्या माझ्या वृथा रे खालती पाहूं
जिवाला जाळते चिंता 'कशी मी एकटी राहूं ?'

वयाची वाढते सीमा नको आतां बघूं अंत
गळ्यांशीं लागलें पूर्ण किती घेऊं तुझी खंत ?

निराशेनें अजूनी ह्या जिवाला कैद माहेर
तुझ्या प्राप्तीविना मैना उडेना स्वैर बाहेर !

# वांझ

[ मनी ]

प्रभो काय मी करूं　　　　　कसें मज होईना लेकरूं ?
　　　　अपार लक्ष्मी वसे घरांत
　　　　चाकर कामांला दिनरात
　　　　सौख्याची जरि हो बरसात
मन हें लागे झुरूं　　　　　कसें मज होईना लेकरूं ?
　　　　विवाह होउनि आतां मजला
　　　　किती काळ तो लोटुनि गेला
　　　　बहार तारुण्याचा सगळा
हाय ! लागला सरूं　　　　　कसें मज होईना लेकरूं ?
　　　　नवस किती मीं संतत केले
　　　　पिंपळवृक्षाभंवतीं फिरलें
　　　　तुळशीपूजन करून दमलें
वठला कायातरू　　　　　कसें मज होईना लेकरूं ?
　　　　बुवा फकीरां देउनि मान
　　　　केली द्रव्याची धुळदाण
　　　　दिलें तयांनीं जें वरदान
खरें कोंठवर धरूं　　　　　कसें मज होईना लेकरूं ?

उपवासाचें ठसुनी मर्म
अनेक केले दान नि धर्म
पालटतां नच खडतर कर्म
माथें लागे फिरूं कसें मज होईना लेकरूं ?

'त्यांनीं' मज डॉक्तरां दाविलें
वैद्याचेंही औषध प्यालें
निदान माझें कुणा न झालें
रोगी कैशी ठरूं ? कसें मज होईना लेकरूं ?

गाय वासरूं फिरे घेउनी
लतिका हासे फुलां मिरवुनी
घार पिलांना दे भरवूनी
मीच दीन पांखरूं कसें मज होईना लेकरूं ?

पुत्रवती त्या स्त्रिया हिणवती
काय वदूं तुज देवा अन्तीं
नसेल जर मज मोक्षप्राप्ती
सुखें मला दे मरूं कसें मज होईना लेकरूं ?

# कुठवर— ?

[ अवनी ]

कुठवर मज ठेवणार झुलत तूं कुमारी
अन्त बघुनि घालतेस घाव कां जिव्हारीं ?

लोभुनिया तुजवरती
मोहित मम होइ मती
हृदिंची तव प्रेम-गती
भासे पण न्यारी !

माझें तें सकल तुला
अर्पियलें त्या न तुला
मनिंची तूं भाव-कला
प्रगटशी न सारी !

मूर्त तुझिच ह्या जगांत
कोरुनि मी अंतरांत
पूजितसें दिवसरात
वेडावुनि भारी !

नयनीं तव तेज भरे
बघुनी मी जग विसरें
मीलनास कां न त्वरें
दाविशी तयारी ?

चाळवणी रोज किती
दाखविशी त्या न मिती
झुरुनि झुरुनि हृदय अती
लोपते हुषारी !

आळवून, आळवून
तुज गेला दिल् खचून
'हो' वदुनी तूं अजून
तार ब्रह्मचारी !!

## कवींनो !

[ वसंत ]

कवींच्या सर्व गीतांचा पहा काढून आढावा
जिथें तेथें असे प्रीती, तयांची व्यर्थ ती सेवा !
शिरोभागास गीतांच्या वृथा प्रस्तावना जाडी
परंतू आंतुनी त्यांच्या दिसूनी येत ना गोडी !
स्त्रियांच्या देखुनी लीला चढे तत्स्फूर्तिला रंग
म्हणूनी प्रेम वर्णाया तयांचे चालती ढंग !
विषारी पारतंत्र्यानें जिथें हा गांजला देश
तिथें हे प्रेमकाव्यांचे कवी गातात संदेश !
झडावें गान शाहीरी अतां देशामधें फक्त
तथापी गान प्रेमाचें कवी गाण्यांत आसक्त !
रचा हो प्रेमवेड्यांनो ! कसेंही काव्य रंगेल
तया दुर्लक्ष देण्याला अम्हांला काळ सांगेल !
कितीही पुस्तकें छापा न वाचूं एकही पान
कुठें हें प्रेमरडगाणें ? कुठें तें शाहिरी गान ?
करा हो दुष्ट हेतूनें स्त्रियांचीं वर्णनें खोटीं
अशानें स्त्रीसमाजाची न हानी होतसे मोठी !
नको तें काव्य गाऊनी भरा राष्ट्रांत अंधार
म्हणूं आम्ही कवी यांचा नसे राष्ट्रास आधार !
अम्हांला द्यावया स्फूर्ती खरा 'शाहीर गोविंद'
कवी हे सर्व आतांचे बुडाले प्रेमसिंधूंत* !
कवींनो ! चालवा तुम्ही अजूनी प्रेमरडगाणें
कवींचें काव्य वाचाया न आम्ही लागतों देणें !

* याला मी तरी अपवाद कसा ठरेन ?

## कांहीं म्हणा पण—

[ मंजरी ]

मज 'भ्याड' कुणीही रसिकांनीं बोलले
वा 'चोर' नांव हें बळें जरी लादलें
'वेड्यां'त काढिलें किंवा मजला कुणीं
साहीन सर्व तें वदाल तोंडांतुनी !

पण कृपा करूनी 'कवी' म्हणा ना मला
इरसाल 'शिवी' त्याविना कुठें आजला !

# राष्ट्रीय निशाण

[ भूपतिवैभव ]

हें निशाण राष्ट्रिय फडको आकाशांत
संदेश वायुसह त्याचा वाहो शांत !
नयनांस दिसावी स्मृती जुन्या काळाची
हृदयांत तयानें जडो स्फूर्ति क्रांतीची !
मावळे जागले शिवबाच्या वचनाला
महाराष्ट्र शोभला तेव्हां स्वातंत्र्याला !
रोविला रामदासांनीं झेंडा भगवा
ल्ढविलाहि त्याचा जरिपटक्यानें कावा !

स्वातंत्र्य मिळाया पूर्वीं– रोकडें
आहुती दिल्या वीरांनीं– चहुंकडे
विजयाचे झडले तेव्हां– चौघडे

घालिते राष्ट्रकार्यास यशश्री माळ
इतिहास सांगतो मागिल फिरुनी काळ !

भारतास आतां जडला परकी पाश
परि प्रत्येकाचा ठरला आहे नाश !
'स्वातंत्र्य-मंत्र' जो सांगितला गांधींनीं
पाळणें सदा तो योग्य येतसे दिसुनी !
ऐक्यांत नांदणें देशी व्रत आचरुनी
मग ग्रहणांतुनि हा जाइल देश सुटूनी !

'स्वातंत्र्य' कुणाला कोणीं नाहीं देणें
तें ज्याचें त्यानें सामर्थ्यानें घेणें !

हें निशाण त्यासाठीं कां– फडफडे
दे ग्वाहि सर्व जीवांना– "व्हा खडे !
घ्या स्वतंत्रतेचे आतां– नव धडे

आयुष्य चाललें भूमातेस्तव झीज–
सोसून, करावें जन्माचेंही चीज !"

## कशाचें स्वातंत्र्याचें गीत— ?

[ कोकिळा ]

कशाचें स्वातंत्र्याचें गीत ?

सधन देश हा भारत अपुला
स्वतंत्र होता पूर्वी सगळा
त्यावर होउनि परकी हल्ला
कधींपासुनी खितपत पडला दास्याच्या खाईंत
कशाचें स्वातंत्र्याचें गीत ?

इतिहासाचें पान उलटलें
अलोट वैभव नष्ट जहालें
होतें नव्हतें शौर्य लोपलें
चोंहिकडूनी पंगू बनलों परक्यांच्या बंदींत
कशाचें स्वातंत्र्याचें गीत ?

एकी नाहीं त्यांत आपुली
धर्म आणखी पक्षांमधली
सदान्कदा भांडणें चालली
अस्पृश्यांना तुच्छ लेखितों ऐटीनें मिरवीत
कशाचें स्वातंत्र्याचें गीत ?

पोट आपुलें भरण्यासाठीं
अहोरात्र ते मजूर खपती
त्यांना नच देऊन सवलती
मालक सारे मात्र कंठिती चैनीनें जीवीत
कशाचें स्वातंत्र्याचें गीत ?

पाउस नसतां कसलीं शेतें
शेतकऱ्यांची दैना उडते
कींव तयांची कुणास येते ?
सारामाफी कुठें तयां पण धनको करितो चीत
कशाचें स्वातंत्र्याचें गीत ?

सर्वस्वाचा होम करूनी
कैदेमध्यें गेले त्यांनी
अन्नसत्याग्रह चालवुनी
तत्त्वासाठीं प्राण सोडिला हाल जिथें सोशीत
कशाचें स्वातंत्र्याचें गीत ?

स्वातंत्र्याचें गीत अम्हांला
खरें खरें तें लाभायाला
प्राण नको का वेंचायाला ?
स्वतंत्र नाहीं देश आपुला तोंवर ह्या पृथ्वींत—
कशाचें स्वातंत्र्याचें गीत ?

# होउं शिपाई

[ गज्जल ]

दास्यांत कधींपासुन ही भोगत माई
स्वातंत्र्य तिला लाभविण्या होउं शिपाई !

ऐश्वर्य तिचें मागिल जाऊन लयाला
ये हीन दशा आज उठूं सत्वर भाई !

मोडून झणीं सर्व अतां पक्ष विरोधी
तें ऐक्य करूं मारुनि ना व्यर्थ बढाई !

आदर्श धरूं जीवन गांधी-टिळकांचें
देशार्थ मरूं खेळत ती नित्य लढाई !

ना स्वस्थ बसूं गात वृथा पूर्वज-कीर्ती
ते शूर खरे, होउं तयांहून सवाई !

पाश्चात्य किती देश पहा आज स्वतंत्र
तें सौख्य मिळाया अपणां काय मनाई ?

तो सांगतसे काळ जुना काय अजूनी
मागून कुणा होत न ती राज्य-कमाई !

सामर्थ्य अतां वाढविण्या सैनिक होऊं
देशार्थ लढाया न करूं अल्प ढिलाई !

ये वेळ जरी प्राण सुखें आपण देऊं
स्वातंत्र्य कमावून जगा दावुं धिटाई !

— वंदे मातरम् —

REFBK-0006196